# वार्षिक सर्वसाधारण सभा

सहकारी संस्थांची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रत्येक वर्षी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून ६ महिन्याच्या आत म्हणजेच घेण्याची जबाबदारी



विद्यमान सहकारी कायद्यात आहे. येथून पुढे पुन्हा पुन्हा १७ व्या घटना दुरूस्ती नंतरचा सहकार कायदा असा शब्द प्रयोग करण्या ऐवजी **विद्यमान सहकारी कायदा** असे संबोधणे योग्य राहणार आहे. आणि जर एखाद्या सहकारी संस्थेने अशी वार्षिक सर्वसाधारण सभा बोलवली नसेल, याबाबतीत निबंधकास त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास विहित केलेल्या रितीने सभा बोलविता येईल.

संपुर्ण महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था** ह्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी छपाई केलेल्या वार्षिक अहवालात जी विषयसूची प्रसिध्द करतात, ती वेगवेगळ्या पध्दतीत असते. वरीलपैकी अनेक संस्था वेगवेगळ्या पध्दतीने वार्षिक सभेमध्ये विविध विषय विषयपत्रिकेत समाविष्ठ करतात. वास्तविक जे विषय संचालक मंडळाच्या सभेच्या अखत्यारित आहेत, ते सुध्दा विषय वार्षिक सभेमध्ये विषय पत्रिकेमध्ये आणून मंजूर करून घेतले जातात. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये कोणत्या विषयांचा अंतर्भाव असला पाहिजे, ही जरी सहकार कायद्यात तरतूद असली तरी, राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी आदर्श विषयसूची सर्व वरील प्रकारच्या सहकारी संस्थांना तसेच प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या व प्रक्रिया संस्था यांना लागू करणे आवश्यक आहे. **अनेक वेळा अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या इतर विषयांमध्ये अनेक विषय चर्चिले जावून, त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूरी सुध्दा देण्यात येते व त्याचे ठरावात रूपांतर सुध्दा होते. परंतु या संदर्भात सुध्दा सहकार कायद्यामध्ये कुठलीही तरतूद नाही** . राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी सहकारी संस्थांना कायद्यास अधिन राहून या संदर्भातदेखील अधिकृत आदेश

पारित केले नाहीत. शिवाय वार्षिक सभेच्या विषय पत्रिकेतील विषय संपल्यानंतर ज्या सुचना लिहिल्या जातात, त्यासंदर्भात देखील कुठलाही कायदा किंवा नियमावली नाही. त्यामुळे **ह्याच परिस्थितीचा गैरफायदा घेऊन सरकारी अधिकारी संस्थांना अडचणीत आणतात. किंबहुना अधिकाराच्या जोरावर त्यांचेवर रेटून कारवाई देखील करतात**. ह्या सर्व गोष्टी कायद्याच्या चौकटीत बसविणे आवश्यक आहे. ह्यासाठी राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी सहकार कायद्याचाच आधार घेवून वार्षिक सर्वसाधारण सभा / विशेष सर्वसाधारण सभा / सर्वसाधारण सभा यांची **विषयसूची संपल्यानंतर सभासदांसाठी सुचना या संदर्भात योग्य ते निश्चित आदेश पारित करावेत. जेणेकरून असा आदेश कायदेशीर आवाहनित होणार नाही. व त्या सुचनांना १०० टक्के वैधानिकत्व प्राप्त होईल.**

म्हणून या विषयाचे गांभीर्य व परिस्थती लक्षात येण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये वरील विविध वित्तीय सहकारी संस्थांच्या वार्षिक अहवालात विषय सुचीमध्ये जे विषय अंतर्भाव केलेले असतात, ते सर्व एकत्रितपणे केल्यास खालील विविध विषय सर्वसाधारणपणे दृष्टीक्षेपात येतात.

विषय क्र. १ : मागील आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

विषय क्र. २ : नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे. तसेच संचालक मंडळाच्या अहवालास मान्यता देणे.

विषय क्र. ३ : नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे व पुढील वर्षाकरिता अंदाजपत्रक मंजूर करणे.

विषय क्र. ४ : नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाच्या झालेल्या निव्वळ नफा विभागणीस व लाभांष जाहीर करणेसाठी मा. संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार मजूंरी देणे.

विषय क्र. ५ : मा. सनदी लेखापरिक्षक यांच्या नुकत्याच संपलेल्या वर्ष अखेरच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे. तसेच अंतर्गत हिशोब / टॅक्स लेखापरिक्षण तपासणीस यांच्याकडून आलेल्या अहवालास मंजूरी देणे.

विषय क्र. ६ : पुढील आर्थिक वर्षाचे अंतर्गत वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी लेखापरिक्षकाची

नियुक्ती करणे व त्यांचे अधिकृत शुल्क ठरविण्याचा अधिकार देणे.

विषय क्र. ७ : सामोपचार कर्ज परतफेड योजनेअंतर्गत झालेल्या व्यवहारास मान्यता देणे.

विषय क्र. ८ : महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ४९ अन्वये मा. वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केल्यानुसार संस्थेचे वसुल न होऊ शकणारे इतर येणेची रक्कम निर्लेखित करणे.

विषय क्र. ९ : उपविधी दुरूस्ती प्रस्तावावर विचार विनिमय करणे.

विषय क्र. १०: वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची कि ज्यांच्या नावे आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या हजेरी बुकात सभेस उपस्थित म्हणून नाहीत अशा सभासदांच्या गैरहजेरीस मंजूरी देणे.

विषय क्र. ११: ठेवीवरील व्याजदर व कर्जावरील व्याजदर निश्चित करणे.

विषय क्र. १२: व्यवस्थापक समिती व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाच्या वसुली पत्रकास मंजुरी देणे.

विषय क्र. १३: सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणवत्तेनुसार बक्षिस देवून सत्कार करणे.

विषय क्र. १४: संस्थेच्या कामकाजासाठी नवीन वाहन खरेदी प्रस्तावास मान्यता देणे.

विषय क्र. १५: बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.

विषय क्र. १६: तंटा निवारण समितीची स्थापना करणे.

विषय क्र. १७: नवीन शाखा सुरू करण्याचा विचार करणे.

विषय क्र. १८: कर्मचारी सेवानियम, भविष्य निर्वाह निधी व ग्रॅज्युईटी नियम बनविणे व त्यास मंजूरी देणे.

विषय क्र. १९: संस्थेच्या मुख्य कार्यालय अथवा शाखेसाठी जागा भाडेतत्त्वावर अगर कायम खरेदी तत्त्वावर घेणे.

विषय क्र. २०: कर्ज थकबाकी वसुली व कर्ज थकीत सभासदांवर केलेल्या कारवाईची नोंद घेणे.

विषय क्र. २१: सभासदांकडून सभेपूर्वी किमान ४ दिवस अगोदर लेखी स्वरूपात आलेल्या सुचनांवर

चर्चा करणे.

विषय क्र. २२: ३ वर्षापूर्वीच्या सभासदांचा शिल्लक लाभांश राखीव निधीत सहकार कायद्याप्रमाणे वर्ग करणेबाबत.

विषय क्र. २३: संचालक मंडळाने आर्थिक वर्षात संस्थेच्या दैनंदिन कारभाराविषयी केलेल्या कामकाजास मान्यता देणे.

विषय क्र. २४: सभासदांचे आभार मानणे.

म्हणून मा. सहकार आयुक्तांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये कोणते विषय समाविष्ट करणे आवश्यक आहे या विषयासंदर्भात वरील प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांमध्ये समानता आणण्यासाठी त्वरीत लक्ष घालणे आवश्यक आहे. जेणेकरून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात किमान ह्या विषयाबाबतीत एकसूत्रता येईल व त्याचे सुपरिणामदेखील राज्याला, सहकारी संस्थांना तसेच सभासद - ठेवीदारांना दिसतील.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**